Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education S.R.No.832-A, Final Plot No. 178,179, Near Balchitrawani, Behind Agharkar Research Institute, Bhamburda, Shivajinagar, Pune-411004.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, स.न.८३२ ए, फा.प्लॉ.नं.१७८, १७९, बालचित्रवाणी शेजारी, आघारकर रिसर्च इन्स्टिट्यूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे-४११००४

Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 Secretary(P) : 25651750 । EPABX -25705000
Email : secretary.stateboard@gmail.com

परीक्षा प्राधान्य / महत्वाचे

जा.क्र.रा.मं./परीक्षा-७/ 153
पुणे - ४११००४
दिनांक- १४/०१/२०२५

प्रति,
विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च
माध्यमिक शिक्षण मंडळ,
सर्व विभागीय मंडळे

**विषय** - फेब्रुवारी-मार्च २०२५ मधील माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षेस प्रविष्ट होणा-या विद्यार्थ्यांना शास्त्रीय कला, चित्रकला व लोककला प्रस्ताव सादर करण्यास मुदतवाढ देणेबाबत.

**संदर्भ** :- शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय संकीर्ण-२०१६/ प्र.क्र.२०२/ एस.डी.२ दि.२४/११/२०१७

उपरोक्त विषयास अनुसरून कळविण्यात येते की, संदर्भिय शासन निर्णयानुसार शास्त्रीय कला, चित्रकला क्षेत्रात प्राविण्य मिळविणाऱ्या व लोककला प्रकारामध्ये सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना सवलतीचे अतिरिक्त गुण देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येते. सदर शासन निर्णयातील मुद्दा क्र. ०५ मध्ये याबाबतचे प्रस्ताव विद्यार्थ्यांनी माध्यमिक शाळेकडे दि. १५ डिसेंबर अखेर व माध्यमिक शाळांनी विभागीय मंडळाकडे सदरचे प्रस्ताव सादर करावयाची अंतिम तारीख १५ जानेवारी अशी नमूद आहे

तथापि शासकीय रेखाकला (एलिमेंटरी व इंटरमिजिएट ड्रॉईंग ग्रेड) परीक्षा २०२४ चा निकाल जानेवारी २०२५ च्या दुसऱ्या आठवड्यात जाहीर करण्यात येणार असल्याने शास्त्रीय कला, चित्रकला व लोककला प्रस्ताव स्विकारण्याच्या मुदतीमध्ये वाढ करण्याबाबत विविध संघटनांनी या कार्यालयाकडे विनंती केली आहे. त्याअनुषंगाने सदर प्रस्ताव स्विकारण्याच्या दोन्ही तारखांना खालीलप्रमाणे मुदतवाढ या वर्षासाठीच देण्यात येत आहे.

| अ. क्र. | तपशील | शासन निर्णयानुसार अंतिम दिनांक | वाढीव मुदतीसह सुधारित अंतिम दिनांक |
|---|---|---|---|
| १. | विद्यार्थ्यांनी शाळेकडे प्रस्ताव सादर करणे | दिनांक १५ डिसेंबर | शुक्रवार, दि.२४ जानेवारी २०२५ |
| २. | शाळांनी विभागीय मंडळाकडे प्रस्ताव सादर करणे | दिनांक १५ जानेवारी | शुक्रवार, दि.३१ जानेवारी २०२५ |

तरी उपरोक्तनुसार सर्व विभागीय मंडळांनी योग्य ती कार्यवाही करावी. सदर मुदतवाढ आपल्या कार्यकक्षेतील सर्व माध्यमिक शाळांच्या निदर्शनास आणून देवून त्याप्रमाणे मुदतीत कार्यवाही करण्याबाबत सर्व संबंधितांना सूचित करावे. तसेच आपल्या स्तरावरुन याबाबत प्रसिध्दी देण्यात यावी व कोणताही पात्र विद्यार्थी सदर गुणांच्या सवलतीपासून वंचित राहणार नाही याची संबंधितांनी दक्षता घ्यावी.

(देविदास कुलाळ)
सचिव,
राज्यमंडळ, पुणे-४.

क्र.कोविमं./माध्य.परीक्षा/ 152
कोल्हापूर ४१६००४
दिनांक १४/०१/२०२५

प्रति,
मुख्याध्यापक,
सर्व मान्यताप्राप्त शाळा
सातारा, सांगली, कोल्हापूर

विषय :- माध्यमिक शालांत (इ.१०वी) प्रमाणपत्र परीक्षा फेब्रु./मार्च २०२५ शास्त्रीय कला, चित्रकला व लोककला प्रस्ताव सादर करण्यास मुदतवाढ देणेबाबत.

उपरोक्त विषयास अनुसरुन फेब्रु./मार्च २०२५ इ.१०वी परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांचे शास्त्रीय कला, चित्रकला व लोककला प्रस्ताव सादर करण्यास राज्यमंडळ पुणे यांचे वरील पत्राप्रमाणे मुदतवाढ देण्यात आलेली असून त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

**(सुभाष रा.चौगुले)**
**विभागीय सचिव,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर**